**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** हुपरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0309 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/11/2025 22:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 01/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/11/2025
**Time From (वेळेपासून):** 10:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/11/2025 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 017
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/11/2025 21:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** आण्णाभाऊ साठे चौक, पटटणकोडोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): उज्वला मारुती भडकमकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,विभाग, कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,विभाग, कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8446153029

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदेश आनंदा शेटे | | | 1. रा नरंदे, ता हातकणंगले,, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रणजित आनंदा बिरांजे | | | 1. आण्णाभाऊ साठे चौक, पटटणकोडोली,, ता हातकणंगले, जिकोल्हापूर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रूपये भारतीय चलनी नोटा मिकीस | 70,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)**):**

70,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास**)):**

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

फिर्याद दिनांक - 01/11/2025

मी उज्वला मारूती भडकमकर वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8446153029 समक्ष हुपरी पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

मी दिनांक 31/10/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर या कार्यालयामार्फत दक्षता जनजागृती 2025 चे अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयात विविध ठिकाणी जनजागृती करीत असताना मला पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांनी कार्यालयात 16.00 वा चे सुमारास बोलावुन घेवुन, समक्ष हजर असले तक्रारदार लखन संपत कोरवी, वय 32, व्यवसाय - मजुरी, रा.मु.पो.हुपरी, ता. हातकंणगले, जि. कोल्हापूर यांची ओळख करून देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले व त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व आम्हास पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी त्यांची थोडक्यात हकिकत सांगितली की, मी वरील गावचा रहिवाशी असुन मी व माझे मित्र विशेंबर मिठारे, सोनवणे व गिरी असे दिनांक 30/10/2025 रोजी रात्रौ 10.30 वा.चे सुमारास आमचे ओळखीचे वासीन यांचे वाळवेकर नगर, हुपरी येथील घरी तीनपानी जुगार खेळत होतो. त्यावेळी हुपरी पोलीस ठाणेचे पोलीस संदेश शेटे साहेब, उदय कांबळे साहेब व त्यांचे सहकारी त्याठिकाणी आले. त्यांनी आमची नावे लिहुन घेतली व आमचे मोबाईल तसेच आमचेकडील पैसे काढुन घेतले. त्यानंतर त्यांनी एका कागदावर कोणाकोणाचे किती पैसे आहेत ते ही लिहुन घेतले. त्यावेळी आम्ही सर्वांनी त्यांना विनवणी केली की, साहेब एक वेळ चुकी झाली, माफ करा, परत जुगार खेळणार नाही असे बोललो. त्यावेळी संदेश शेटे साहेब यांनी थांब जरा, नंतर बोलु असे म्हणाले. थोडया वेळाने शेटे साहेबांनी पोलीस स्टेशनला जावुया असे बोलले. त्यावेळी आम्ही त्यांना माफ करा, परंतु केस करू नका असे बोललो. त्यावेळी शेटे साहेब यांनी दोन लाख रूपये दे सर्वांना सोडतो असे म्हणाले. त्यावेळी आम्ही रणजित बिरांजे यास फोन करून बोलावुन घेतले व त्यास आम्ही सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर शेटे साहेब यांनी दोन लाख रूपये दया सर्वांना सोडतो असे सांगितले. त्यावेळी रणजीत बिरांजे यांने मध्यस्थी करीत आम्हाला एक लाख रूपये दया मी ते पोलीसांना देवुन तुम्हाला सोडवतो असे म्हणाला. त्यानंतर आम्ही पोलीस केॅस होईल या भितीने होय म्हणालो. त्यावेळी रणजित बिरांजे यांनी पोलीसांना एक लाख देतो असे सांगितले. त्यावेळी शेटे साहेब ठिक आहे म्हणाले. त्यावेळी शेटे साहेब व उदय कांबळे यांनी आमचे मोबाईल व घेतलेले पैसे आम्हास परत दिले. संदेश शेटे व उदय कांबळे यांचे टिम ने आम्ही जुगार खेळाताना आम्हाला पकडले त्यानंतर संदेश शेटे साहेब यांनी आमचेवर जुगाराची केस दाखल करणार अशी भिती घालुन रणजित बिरांजे याचे मध्यस्थीने माझेकडे एक लाख रूपये लाच मागत असल्याची खात्री झाली. परंतु शेटे साहेब यांनी मागणी केलेले पैसे देण्याची माझी ईच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी तक्रारदार कोरवी यांनी ते पोलीस शेटे व खाजगी इसम बिरांजे यांना दिनांक 31/10/2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजता भेट घेणेस जाणार असलेचे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना हुपरी येथे रेदांळ रोडलगत असले बिरदेव मंदिरासमोर जावुन थांबणेस सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा.निवासी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने शासकीय पंच बोलावुन घेतले. शासकीय दोन पंच आलेनंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन शासकीय वाहनातुन कोल्हापूर, मुडशिंगी, पटटणकोडोली मार्गे

हुपरी येथे बिरदेव मंदिरासमोर आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी मी तक्रारदार कोरवी यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी आम्ही सर्वांना तक्रारीची पडताळणी येथुन करणार आहोत असे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार कोरवी यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. कोरवी यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार कोरवी व पंच नं.01 गावडे यांचेसह प्रथम, पोलीस संदेश शेटे यांचेकडे हुपरी पोलीस ठाणे येथे पाठवुन कोरवी यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे पोलीस संदेश शेटे हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार कोरवी व दोन्ही पंचाचे निवेदन घेतली. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार कोरवी व पंचाची खात्री करून दिली. तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 18.45 वाजता चालु करून, तो तक्रारदार कोरवी यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन तक्रारदार कोरवी व पंच नं.1 गावडे यांना पोलीस शेटे यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार कोरवी यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 एफ.ई.6126 वरून पाठविले. तक्रारदार कोरवी व पंच नं.1 गावडे असे पोलीस शेटे यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 19.16 वाजता बंद केला. त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 गावडे यांना पोलीस शेटे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार कोरवी यांचे सोबत हुपरी पोलीस ठाणे येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार कोरवी यांनी त्यांचे मो. नं. 9579345554 वरून पोलीस संदेश शेटे यांना त्यांचे मो.नं.8208589361 वरती फोन करून कोठे आहे असे विचारले असता त्यांनी पंधरा वीस मिनीटात पोलीस स्टेशनला येतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार कोरवी यांनी त्यांचे मोबाईल वरती रणजित बिरांजे यांना त्यांचे मो.नं.7028131663 वरती फोन केला त्यावेळी तक्रारदार यांनी बिरांजे याला पोलीस स्टेशनला साहेबांना भेटायला असल्याचे सांगितले. त्यावेळी बिरांजे "ते तिथं शिवाजी चौकात जावून गाठ पड जा शेटे साहेबांना, नाही तर कल्बवर ये डायरेक्ट माझेकडं, मांगुर ला ये... " असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार कोरवी "कोणाला शेटे साहेबाला गाठ पडून तुझेकडे येवू" असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे "हा, ये की..." असे म्हणाले त्यानंतर फोन बंद केला. त्यानंतर काहीवेळाने पुन्हा तक्रारदार कोरवी यांनी बिरांजे यांना फोन केला. त्यावेळी कोरवी व बिरांजे यांचेत शेटे साहेब अजुन आले नाहीत तसेच ते येत असल्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी कोरवी यांनी बिरांजे यांना साहेबांना श्री चौकात येतोय म्हणून सांग असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर पुन्हा कोरवी यांनी पोलीस शेटे यांना फोन करून, श्री चौकात आल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस शेटे यांनी ते दहा मिनिटात तेथे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर काहीवेळाने पोलीस शेटे यांना भेटण्यास श्री चौकात जात असतानाच पोलीस शेटे हे पोलीस स्टेशनला आले. त्यावेळी पोलीस स्टेशनच्या बाहेर पोलीस शेटे हे तक्रारदार कोरवी यांना भेटले. त्यावेळी पोलीस शेटे "मी साहेबा सोबत होतो..." असे म्हणाले. त्यावेळी कोरवी "मी काय म्हणालोय..." असे म्हणाले. त्यावेळी "तुम्ही रणजितला जावून भेटा, जावा काय विषय नाही..." असे म्हणाले. त्यावेळी कोरवी "बर काय करायचं सांगा मला, रणजितदा ला मांगूरला जावून गाठ पडतो मी..." असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेटे "रणजितदाला गाठ पडा जावा..." असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत रणजित याला भेटण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यानंतर पोलीस शेटे तेथुन निघुन गेले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन परत येत असताना, बिरांजे यांचा तक्रारदार यांना फोन आला त्यावेळी त्यांचेत शेटे साहेबांनी त्यांना भेटायला सांगितल्याचे व त्यांनी तक्रारदार कोरवी यांना क्लबवर भेटायला बोलविले असल्याचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन आलो आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार कोरवी यांना पोलीस शेटे यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 गावडे यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

तक्रारदार कोरवी यांना पोलीस शेटे यांनी रणजित याला जावुन भेटण्यास सांगितल्याने व रणजीत याने तक्रारदार कोरवी यांना भेटण्यास बोलविल्याने सर्वामते रणजीत बिरांजे यांची लाचेच्या मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही पुन्हा तक्रारदार कोरवी, पंच व सापळा पथक यांना सुचना दिल्या त्यानंतर रणजीत यांचे पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 19.56 वाजता चालु करून, तो तक्रारदार कोरवी यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन तक्रारदार कोरवी व पंच नं.1 गावडे यांना रणजित यांची मांगुर येथे भेट घेण्याकरीता तक्रारदार कोरवी यांचे मोटर सायकल वरून पाठविले. तक्रारदार कोरवी व पंच नं.1 गावडे असे खाजगी इसम रणजित कोरवी यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 20.33 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 गावडे यांना खाजगी इसम रणजित बिरांजे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार कोरवी यांचे सोबत रणजीत बिरांजे यांना भेटलो त्यावेळी तक्रारदार कोरवी "आता तिथं गेलो साहेबासनी विचारलं, साहेब काय म्हटलं..." असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे " ते तिथं तुझे कडून एक रूपया सुध्दा घेणार नाहीत, ते सगळ पैसे माझेकडं दयायला सांगितल्यात इथं, तुला फोन लावून देतो इथं, इथल्या इथं बोल तेन्ही माझेकडं जमा करायला सांगितल्यात एक मिनीटं बोलं..."असे म्हणाले. त्यावेळी कोरवी " त्याला गाठ पडलो पोलीस स्टेशनला, साहेब काय ते.." असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे "संदेश शेटे" असे म्हणाले. त्यानंतर त्यांचे पैसे कमी करण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी कोरवी "माझे कडं आता एक, वीस हजार रूपये हाईत, रणजित दा माझे कडं, वीस हजार रूपये आहेत" असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे " होत नाही, वीस हजार मध्ये सोडून दे विषय..." असे म्हणाले. त्यावेळी कोरवी यांनी "किती दयायचं ते तर सांग विषय संपवून टाक तिकडं आता भाऊजीसनी बोलवून घेतले आता ते यायला लागल्यात"असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे "किती दयायचं म्हणजे, त्यांना एक लाख रूपयेच दयायचं आहेत. तुझ्याकडून काय दयायचं ते दे, मी वरचे पैसे घालून देतो, याच्या पलीकडं मी एक रूपया कमी करा म्हणू शकत नाही, किती होतोय तो तुझा आकडा मला सांग, फायनल जेवढा तु देशील त्यात वरचे पैसे, मी पदरचं घालतो. तु एक आकडा सांग मला, तुला किती दयायला जमतय तेवढं सांग, तुला समोर फोन लावून, त्यासनी पैसे नेऊन देतो असे म्हणाले." त्यावेळी कोरवी "पन्नास हजार रूपये, वैयक्तीक एक पन्नास हजार रूपये देतो त्याला" असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे "ठिक हाय, मी माझं पन्नास हजार सोसतो, एक काम कर जा सांगतो, आता एक, सत्तर हजार रूपये दे जा, एक तीस हजार घालतो, आणि त्यांना एक लाख रूपये देतो".असे म्हणाले. त्यानंतर रणजित बिरांजे यांनी पोलीस शेटे यांना फोन लावला त्यावेळी पोलीस शेटे " हॅलो रणजित दा " असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे "आलाय माझे जवळ लखन, याने रात्री शब्द दिलता, तुम्हाला एक लाख रूपये करायच म्हणुन.. असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेटे "हं" असे म्हणाले. त्यानंतर पोलीस शेटे, तक्रारदार कोरवी व खाजगी इसम बिरांजे यांचेत पैशाचे व इतर विषयाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी पोलीस शेटे, तक्रारदार कोरवी यांना " बर मी सांगतो तस करा आता, काय रणजित दा मी सांगतो तस करा आता" असे म्हणाले. त्यावेळी कोरवी "हां, बर" असे म्हणाले. पोलीस शेटे "ठिक हाय त्यांना पन्नास जमतात म्हणालेत ते" असे म्हणाले. त्यावेळी बिरांजे कोरवी यांना "जमत असेल तर सांग

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
ASHOK BIMARAO CHAVAN
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSMH25653
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी सही)

ठाणे अंमलदार हुपरी पोलीस ठाणे

**Name** (नाव): Ningappa Rangapp

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 11301000362NRCM77